मात्र अनुत्तीर्ण विद्यार्थी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झाले किंवा ATKT सवलतीस पात्र झाले तर अशा विद्यार्थ्यांना येणा-या नवीन शैक्षणिक वर्षात त्यांना व्दितीय वर्षात प्रवेश दिला जाईल.

१२) **शुल्क सन २०१२-१३**

१२.१ **शासकीय व अनुदानित अध्यापक विद्यालय**

| क्र. | शुल्क / बाब | शुल्क दर | वार्षिक |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण शुल्क (दरमहा) | २२० | २६४० |
| २ | सत्र शुल्क (प्रती सत्र) | २२० | ४४० |
| ३ | प्रवेश शुल्क (प्रथम व व्दितीय वर्षाचे मिळून) | २२० | २२० |
| | वार्षिक एकूण रुपये | | ३३०० |

व्दितीय वर्षासाठी प्रवेश शुल्क वगळता उर्वरित शुल्क भरावे लागेल. संबंधित विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षाची परीक्षा दिल्यानंतर तात्काळ तात्पुरत्या स्वरुपात व्दितीय वर्षात प्रवेश घ्यावा. अनुत्तीर्ण झाल्यास सदरचा प्रवेश आपोआप रद्द होईल. भरलेले पूर्ण शुल्क संबंधित प्राचार्यांनी १० दिवसांत परत करावे.

१२.२ **विना अनुदानित / कायम विनाअनुदानित अध्यापक विद्यालय**

प्रवेश घेताना विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील शैक्षणिक शुल्क हे **'अध्यापक विद्यालय विनियमन प्राधिकारणा'** ने मान्य केलेल्या दरानुसार भरावे लागेल. सदरचे शुल्क दर हे दोन वर्षाच्या शिक्षण कालावधीसाठी लागू राहतील. व्दितीय वर्षासाठी प्रवेश शुल्क वगळता उर्वरित शुल्क भरावे लागेल.

१२.३ वरील शुल्काव्यतिरिक्त कोणत्याही अध्यापक विद्यालयास अन्य शुल्क आकारता येणार नाही.

१२.४ **शुल्क भरण्याची कार्यपध्दती :**

१) शासकीय व अनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रवेशार्थीना १२.१ मध्ये दर्शविलेल्या दराने १ वर्षाचे शुल्क प्रवेशाच्या वेळी भरावे लागेल.

२) विना अनुदानित, कायम विना अनुदानित अध्यापक विद्यालयाचे शैक्षणिक शुल्क हे अध्यापक विद्यालयाच्या विनियमन प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या दराने प्रवेशाचे वेळी एका वर्षाचे शुल्क भरणे आवश्यक आहे. दुसऱ्या वर्षाचे शुल्क स्वतंत्रपणे दुसऱ्या वर्षी प्रवेशाच्या वेळी भरावे लागेल.

३) ज्या विनाअनुदानित अध्यापक विद्यालयाचे शुल्क विनियमन प्राधिकारणाने निश्चित केले नाही त्यांच्याबाबत तूर्त रु. १२०००/ वार्षिक शुल्क आकारण्यात येईल व प्राधिकरणाने निश्चित केल्यानंतर फरक समायोजित करावा लागेल.

४) **शासन निर्णय क्र. टीसीएम २००८ / (६५७/०८) माशि-४ दिनांक ३१ जानेवारी २००९ अन्वये मान्यता प्राप्त कायम विनाअनुदानित अशासकीय अध्यापक विद्यालयातील शिक्षण शुल्कात सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून वाढ करण्यास परवानगी दिलेली आहे. माहिती पुस्तिका नियमावलीमध्ये अध्यापक विद्यालयांच्या नावासमोर नमूद केलेल्या शिक्षण शुल्कात वाढ होणेची शक्यता आहे. वाढीव फी देणे विद्यार्थ्यांना बंधनकारक राहिल.**